**॥ श्री ॥**
**॥ बाबा ॥**

# अलंकार

घालू अलंकार हरिला, घालू अलंकार
सुवर्णांच्या ताटी भरले, घालु अलंकार हरिला ॥धृ॥

एक एक गोपी आणि भूषणे अनेक
दर्शनाची भारी गोडी, भारी गोडी
पाहू कृष्णनाथ, देव जगन्नाथ ॥1॥

बाल हरिस पिंपळपान, डूल सरीवाले
वाघनखे शोभे कंठी, बिंदल्या ताईत, देव जगन्नाथ ॥2॥

कृष्ण कमर कंठी गोफ हाती कडी तोडे
सिंहकडे दंडी शोभे, कुंडले कर्णात, देव जगन्नाथ ॥3॥

तरूण हरी कंठी घाली, पाच पदरी गोफ
तुरा शोभे मोतीयांचा, वरी शिरपेच, हसे रमाकांत ॥4॥

सलकडी नि पोची हाती वरती बाजूबंद
अंगुलीत शोभा देती, रत्न मुद्रिकाही, प्रभु लक्ष्मीकांत ॥5॥

★★★★★